परिपत्रक क्र. ७६

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्स:९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email: info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा/सचिव/परिपत्रक/ ४५७ /२००६
दिनांक - 31 JUL 2006

# परिपत्रक

१. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर अभियांत्रिकी शाखेकडून निर्गमित होणा-या परवानगी व मंजूरीच्या प्रती संबंधित वास्तुविशारदांना दिल्या जातात. मात्र झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या वेगवेगळया स्तरावरील दिलेल्या मंजूरी व परवानगीच्या प्रती वास्तुविशारदांना देते वेळेस त्यांच्याकडे संबंधित विकासक किंवा संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे "अधिकार पत्र " आहे किंवा नाही हे पाहिले जात नाही. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या परवानगी व मंजूरीच्या प्रती संबंधित विकासकाचे किंवा संबंधित सहकारी संस्थेच्या प्राधिकृत व्यक्तीच्या ताब्यात जातील अशी खात्री करणे शक्य होत नाही. वेळप्रसंगी अशा मंजूरी व परवानगीचा दुरुपयोगही होऊ शकतो. म्हणून प्रशासकीय सोयीच्या दृष्टिने खालीलप्रमाणे या संदर्भात कार्यपध्दती ठरविण्यात येत आहे.

२. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या प्रस्तावास अभियांत्रिकी शाखेकडून वेगवेगळया स्तरावरील देणेत येणारे परवानगी व मंजूरी संबंधित वास्तुविशारदांना देते वेळी संबंधित विकासक किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थांचे "अधिकार पत्र " प्रत्येक वेळी सादर करणे आवश्यक राहिल. विकासक किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अधिकृत पत्राशिवाय यापुढे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भातील परवानगीचे आदेश संबंधित वास्तुविशारदांना दिले जाऊ नयेत.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

दे. चक्रवर्ती.
[दे. चक्रबर्ती]
मुख्य कार्यकारी अधिकारी